नियमित दिवाणी दावा क्र.१२०/२०१६ नि.७४, ७६ व ७८
खालील आदेश

प्रस्तुतचे अर्ज हे वादी यांच्यामार्फत वादी क्र.१ अशोक नामदेव राक्षे मयत झाल्याने त्यांच्याबाबत दावा अवसान पावल्याने तसे रद्दबातल करुन विलंब माफ करुन दाव्याच्या कामी मयत वादी क्र.१ अशोक नामदेव राक्षे याचे कायदेशिर प्रतिनिधी समाविष्ट करुन घेण्यासाठी दाखल केले आहेत. वादी यांनी पुढे असे नमूद केले की, वादी क्र.१ अशोक नामदेव राक्षे हे दि. ३१.०६.२०२१ रोजी मयत झाले असून वादीचे कायदेशीर वारस मुदतीत रेकॉर्डवर घेतले नसल्याने सदर वादीविरुध्द दावा अवसान झाला आहे. मयत वादी हे कोव्हीड १९ चे लॉकडाउन कालावधीत मयत झाल्यामुळे त्यांचे मृत्युचे दाखले वगैरे कागदपत्रे व अन्य तपशील उपलब्ध झाला नाही. त्यामुळे वादीचे वारस रेकॉर्डवर घेणेस विलंब झाला आहे. तरी अर्ज मंजूर करण्यात यावेत अशी प्रार्थना त्यांनी केली.

२. वादी यांनी विलंब माफ होण्यासाठी नि. ७४ वर अर्ज दिला आहे. त्यातील मजकूर देखील प्रस्तुत अर्जाप्रमाणे आहे. नि. ७८ येथे कायदेशिर प्रतिनिधी दाव्यात समाविष्ट करण्यासाठी दाखल केला आहे.

३. प्रस्तुतचा दावा हक्क शाबीतीसाठी दाखल करण्यात आलेला आहे. वादी मयत झाल्यानंतर कोव्हीड १९ ची संचारबंदी सुरु झाली. कोविड १९ च्या प्रादुर्भावामुळे मा. सर्वोच्च् न्यायालय यांनी किरकोळ अर्ज क्र. ६६५/२०२१ SMW (c) No. 3/2020 यामध्ये स्वतःहून दखल घेवून दि. १५.३.२०२० पासून प्रकरणामध्ये विलंब माफ केला आहे. त्यामुळे मयत वादी यांच्या कायदेशिर प्रतिनिधींना दाव्याच्या कामी आवश्यक पक्षकार म्हणून समावेश करणे मला आवश्यक वाटते. सबब मी खालील आदेश पारीत करतो.

(CNRMHSN110005032016)

# <u>आदेश</u>

१. वादी क्र. १ अशोक नामदेव राक्षे यांचे कायदेशिर प्रतिनिधी यांना दाव्याच्या कामी समाविष्ट करुन घेण्यासाठी झालेला विलंब माफ करुन दाव्याचे झालेले अवसान रद्दबातल करुन सदर कायदेशिर प्रतिनीधी यांना दाव्याचे कामी समाविष्ट करुन घेण्यास मंजूरी देण्यात येते.

२. वादीने तशी दुरुस्ती करावी.

३. सहा अधीक्षक यांनी दावा रजिष्टरमध्ये सदर दुरुस्तीची नोंद करुन घ्यावी.

VINAYAK DATTATRAY PATIL

Digitally signed by VINAYAK DATTATRAY PATIL
Date: 2022.04.26 10:30:10 +0530

दि. २५.०४.२०२२ (वि. द. पाटील)

आटपाडी दिवाणी न्यायाधीश क.स्तर, आटपाडी

**Certificate**

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

Name of the Stenographer - H.P.Haridas
Court - CJJD and JMFC, Atpadi.
Date - 25.04.2022
Order signed by the
Presiding Officer on - 25.04.2022
Order uploaded on 26.04.2022